


# अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबईला 'बेस्ट परफॉर्मिंग युटिलिटी' पुरस्कार

▮ मुंबई : अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेडला (एईएमएल) केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळाच्या (सीबीआयपी) २०१९ सालच्या पुरस्कार सोहळ्यात 'वीजनिर्मिती, पारेषण व वितरण अशी एकात्मिक ऑपरेशन्स असलेली सर्वोत्तम कामगिरी करणारी कंपनी' या पुरस्काराने गौरवण्यात आले. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत उत्तम योगदान देणारी कंपनी म्हणून एईएमएलला मान्यता देण्यात आली. ऊर्जा क्षेत्रातील सर्व विभागांमध्ये आघाडीचे स्थान प्राप्त करून कंपनीने हे दाखवून दिले आहे.

ऊर्जा तसेच नवीन व नूतनीकरणीय ऊर्जामंत्री आर. के. सिंग यांच्या हस्ते अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेडला (एईएमएल) २०१९ सालच्या सीबीआयपी दिवसाच्या ४ जानेवारी २०१९ रोजीच्या साजरीकरणादरम्यान हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अदानी ट्रान्समिशन लिमिटेडचे मुख्य कार्यपालन अधिकारी अरविंद कुमार शर्मा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या यशाबद्दल एईएमएलचे प्रवक्ते म्हणाले, केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळाकडून अशी उच्चस्तरीय राष्ट्रीय मान्यता मिळणे आमच्यासाठी सन्मानाचे आहे. वीज ही एखाद्याच्या घरात किंवा कार्यालयात प्रकाश देण्याच्या पलीकडील काहीतरी आहे, यावर आमचा, एईएमएलचा, ठाम विश्वास आहे.

विजेची खात्रीशिरता, दर्जा आणि स्पर्धात्मकता अधिक सुधारण्यासाठी तसेच आमच्या वितरण क्षेत्रातील लक्षावधींचे आयुष्य उजळून टाकण्यासाठी आम्ही समर्पित वृत्तीने काम करत आहोत. ग्राहकांचा अनुभव अधिक चांगला करणाऱ्या तसेच कार्यक्षमता वाढवणाऱ्या तंत्रज्ञानांमध्ये गुंतवणूक करणे आम्ही यापुढेही सुरूच ठेवू.